## नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 24 ऑगस्ट 2018 रोजी भरलेल्या माहे जुलै 2018 महिन्याच्या सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 23.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई व देखभाल सर्वसमावेशक कंत्राट पध्दतीने करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/उ.आ.(स्व.म.अ.)/245/2018. |
| **ठराव क्र. 564.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई व देखभाल सर्वसमावेशक कंत्राट पध्दतीने करणेच्या प्रस्तावात बाब क्रमांक 1 ते 22 मध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण अंदाजित रक्कम रू. 5 कोटी, 99 लाख, 75 हजार 916 मात्र इतक्या वार्षिक अपेक्षित खर्चास, नवी मुंबई महानगरपालिका खेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई व देखभाल करण्याकरीता विविध एजन्सी / संस्था / NGO यांचेसोबत करण्यात आलेले करारनामे रद्द करण्यास व नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई व देखभाल सर्वसमावेशक कंत्राट पध्दतीने करण्याच्या धोरणास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 24.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | बेलापूर से. 15 भु. क्र. 39 येथे बहुमजली वाहनतळ विकसित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/1331/2018. |
| **ठराव क्र. 565.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "बेलापूर से. 15 भु. क्र. 39 येथे बहुमजली वाहनतळ विकसित करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 27 कोटी, 66 लाख, 03 हजार 695 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 31.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक वाहनतळ (Pay & Parking) चे दर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 9/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/पार्कींग/ 2092/2018. |
| **ठराव क्र. 566.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक वाहनतळ (Pay & Parking) चे दर निश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रस्तावित सुधारीत दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 243(2) नुसार महापालिका वाहनतळ (Pay & Parking) चे दर निश्चित करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **प्रशासनाकडे परत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 35.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2018 ला मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-1/1660/2018. |
| **ठराव क्र. 567.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2018 ला मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, प्रशासकीय सेवा, लेखा सेवा व तांत्रिक सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2018 च्या प्रारूपास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 454, 455 व 457 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **स्थगित.** |
| **विषय क्र. 42.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | परीमंडळ -2 क्षेत्रातील दिघा ते कोपरखैरणे मधील सडलेले/गंजलेले खांब बदलणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1362/2018. |
| **ठराव क्र. 568.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "परीमंडळ -2 क्षेत्रातील दिघा ते कोपरखैरणे मधील सडलेले/गंजलेले खांब बदलणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रू. 3 कोटी, 95 लाख, 93 हजार 265 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 52.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील ईईएसएलच्या माध्यमातुन एस्को तत्वार एलईडी पथदिवे बसविण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1395/2018. |
| **ठराव क्र. 569.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील ईईएसएलच्या माध्यमातुन एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याबाबतच्या प्रस्तावातील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे धोरणात्मक निर्णयास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **स्थगित.** |
| **विषय क्र. 54.**<br>**दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उदयानांच्या सर्वसमावेश कत्रांटाबाबत (performance based-comprehensive contract) फेर प्रस्ताव सादर करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/उदयान/1246/2018. |
| **ठराव क्र. 570.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उदयानांच्या सर्वसमावेश कत्रांटाबाबत (performance based-comprehensive contract) फेर प्रस्ताव सादर करणेच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, **सर्वसमावेश कंत्राटात सुरक्षा रक्षक यांचा समोवश करणेस, घसरगुंडीखाली सॅनपिट किवा रबरमॅट लावणेस आणि उदयानांच्या सर्वसमावेश कत्रांट देताना परिमंडळनिहाय ठेका देणे,** या सुधारणेसह अंदाजे अपेक्षित रूपये 3537.00 लक्ष इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **मंजूर.** |

<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>

**माहे 20 जुलै 2018 ची सर्वसाधारण तहकूब सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. शिल्पा सूर्यकांत कांबळी, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 55<br>जुलै | 571<br>24/08/2018 | मंजूर |
| 2. | **श्रीम. श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 56<br>जुलै | 572<br>24/08/2018 | मंजूर |
| 3. | **श्रीम. अंजली अजय वाळूंज, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 57<br>जुलै | 573<br>24/08/2018 | मंजूर |
| 4. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 58<br>जुलै | 574<br>24/08/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. अनिता सुरेश मानवतकर, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 59<br>जुलै | 575<br>24/08/2018 | मंजूर |
| 6. | **श्री श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"विधि समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 60<br>जुलै | 576<br>24/08/2018 | मंजूर |
| 7. | **श्री श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"विद्यार्थी व युवक कल्याण समिती""** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 61<br>जुलै | 577<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | **श्रीम. जयश्री एकनाथ ठाकूर, यांजकडून :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम 30 अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महानगरपालिका खालील 13 सदस्यांची (मा. महापौर नांवे जाहिर करतील) **"उद्यान व शहर सुशोभिकरण समिती"** हि विशेष समिती सन 2018-2019 या वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे. | 62<br>जुलै | 578<br>24/08/2018 | मंजूर |
| 9. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र.45, मधील कोपरखैरणे बस डेपो ते नॉर्थ पॉईंट शाळेसमारील हेव्ही ड्युटी गटर बनविणे व रस्ता रूंदीकरण करणे. | 74<br>जुलै | 579<br>24/08/2018 | मंजूर |
| 10. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** ई वॉर्ड कोपरखैरणे परिसरातील आवारात स्टॅप कॉंक्रीटीकरण करणे. | 75<br>जुलै | 580<br>24/08/2018 | मंजूर |
| 11. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र.45, रणादेवी सोसायटी समोर हाफ राऊंड गटारे बनविणे. | 76<br>जुलै | 581<br>24/08/2018 | मंजूर |
| 12. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-** **(77)** प्रभाग क्र. 58, वाशी से. 14, 17 येथील सर्व पदपथ अतिशय दयनिय आहेत. सदरचे पदपथ सिडको निर्मित असून कुठल्याही प्रकारची डागडूजी करण्याता आलेली नाही. तरी सर्व पदपथ, नवीन गटारे, नवीन स्लॅब, काही ठिकाणी पदपथ कमी करून रस्ता रूंदीकरण करणे, काही ठिकाणी हेवी ड्युटी स्लॅब टाकून सर्व पदपथांची दूरूस्ती व सुशोभिकरण करणे. | 77<br>जुलै | 582<br>24/08/2018 | मंजूर |
| 13. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 58, वाशी प्रभागातील सर्व रस्त्यांची अतिशय दयनिय बिकट अवस्था आहे. तरी प्रभागातील सर्व रस्ते डांबरीकरण करणे. | 78<br>जुलै | 583<br>24/08/2018 | मंजूर |
| 14. | **श्री. प्रकाश नानाभाऊ मोरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 58, वाशी पामबीच रस्त्यावर से.14 अँकरवाला स्कूल लगत स्थानिक जनतेला रस्ता क्रॉसिंग करण्यासाठी प्रचंड त्रास होत असतो. तरी तेथे स्कायवॉक बांधणे. | 79<br>जुलै | 584<br>24/08/2018 | मंजूर |
| 15. | **श्रीम. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 10, ऐरोली से. 20बी भूखंड क्रमांक 85 गुरूकूल शाळेसमोरील मैदानात नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तारेचे कुंपण घालण्याचे काम सुरू आहे. सदर मैदानाची लालमाती, मुरूम टाकून मैदानाचा समतोलपणा करून डागडुजी करून मैदानाचे काम नागरिकांना सुविधेसाठी करणे. | 80<br>जुलै | 585<br>24/08/2018 | मंजूर |
| 16. | **श्रीम. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 10, ऐरोली भूखंड क्रमांक 47 येथील चिल्ड्रेन पार्कचे काम लवकरात लवकर करणे. | 81<br>जुलै | 586<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17. | **श्रीम. शशिकला अनंत सुतार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 10, ऐरोली से.20बी भूखंड क्र. 85 येथील मैदानात बहुउद्देशीय इमारत उभारण्यात यावी, सिडकोकडून महानगरपालिकेला मिळणाऱ्या अपुऱ्या भूखंडामुळे जनतेला सर्व सुविधा पुरविण्याकरीता आपणांस अनेक भूखंडाची गरज भासणार आहे. परंतु एवढे भुखंड आपणांस मिळतील किंवा नाही याबाबत शंका आहे. त्यामुळे मिळालेल्या भुखंडावरच बहुउद्देशीय इमारत उभी करून सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर भव्य ओपन स्टेज बांधण्यात यावे. पहिल्या मजल्यावर तरूणांसाठी जीम (व्यायामशाळा) बांधण्यात यावी. दुसऱ्या मजल्यावर अभ्यासिका व संगणक कक्ष बांधण्यात यावे. तसेच तिसऱ्या मजल्यावर महिलांसाठी उद्योग प्रशिक्षण वर्ग अशा प्रकारची सुविधा उभारून नागरिकांना एकाच इमारतीत सुविधा मिळणे. | 82<br>जुलै | 587<br>24/08/2018 | मंजूर |
| 18. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 27, घणसोली मध्ये 10 वर्षापूर्वी लोकसंख्येच्या मानाने मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर घणसोली परिसरामध्ये झपाट्याने लोकसंख्या वाढली असून त्याचा भार या मलनि:स्सारण वाहिन्यांवर येत आहे. परिणामी मलनि:स्सारण वाहिन्या अरूंद असल्याने ठिकठिकाणी भरून वाहत आहेत. त्यामुळे परिसरामध्ये दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी येथील भागाचे निरिक्षण करून लोकसंख्येच्या मानाने मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. | 83<br>जुलै | 588<br>24/08/2018 | मंजूर |
| 19. | **श्री. नवीन मोरेश्वर गवते, यांजकडून :-**<br>अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन अधिकाऱ्याची मान्यता) अधिनियम 206 कलम 3(2) अन्वये शासनाद्वारे देण्यात आलेल्या सुविधांकरिता वनजमिनीची मागणी विष्णूनगर ते विजयनगर हा रस्ता लोकांचे दळणवळणासाठी बांधणेसाठी सदर वनजमिनीची मागणी "मा.उप वनसंरक्षक,ठाणे वनविभाग,ठाणे" यांचे कार्यालयाकडे करणे. | 84<br>जुलै | 589<br>24/08/2018 | मंजूर |
| 20. | **श्री. नवीन मोरेश्वर गवते, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 04, दिघा साठेनगर येथील OS-1 भूखंडावर उच्च साठवणूक क्षमता असलेले उच्चस्तरीय व भूमिगत जलकूंभ बांधणे. | 85<br>जुलै | 590<br>24/08/2018 | मंजूर |
| 21. | **श्री. नवीन मोरेश्वर गवते, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 04, दिघा साठेनगर येथील OS-1 भूखंडावर (UHP) नागरी आरोग्य केंद्र व प्राथमिक तसेच माध्यमिक मध्यवर्ती शाळा बांधणे. | 86<br>जुलै | 591<br>24/08/2018 | मंजूर |
| 22. | **ॲड. श्रीम. अपर्णा नवीन गवते, यांजकडून :-**<br>साने गुरूजी बालउद्यानात Open Gym चे साहित्य बसविणे. | 87<br>जुलै | 592<br>24/08/2018 | मंजूर |
| 23. | **ॲड. श्रीम. अपर्णा नवीन गवते, यांजकडून :-**<br>कै. हुतात्मा मोरेश्वर काशिनाथ गवते या माझे प्र.क्र.9 येथील बहूउद्देशीय इमारतीत वाचनालय व व्यायाम शाळेस जागा अपुरी पडत असून सदर इमारतीवर दोन मजल्याचे वाढीव बांधकाम करणे. | 88<br>जुलै | 593<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24. | **ॲड. श्रीम. अपर्णा नवीन गवते, यांजकडून :-** संजय गांधीनगर व नामदेव नगर येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सदरहू नगरात मलनि:स्सारण वाहिन्या व नवीन मोठ्या व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे. | 89 / जुलै | 594 / 24/08/2018 | मंजूर |
| 25. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** शासन निर्णयप्रमाणे सन 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे या अभियानांतर्गत राज्यातील नागरी क्षेत्रासाठी दि. 01/01/2011 रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडी संदर्भात अशा झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीधारकाचे सशुल्क पुनर्वसन केले जाणार आहे. सदर योजनेमधून झोपडीधारकास नवी मुंबई महापालिका क्षेत्रात पडणाऱ्या किमतीत सदर झोपट्टीच्या बदल्यात पुर्नवसन सदनिका उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे जर अपात्र सशुल्क पुर्नवसन योग्य दिनांक 01/01/2011 पूर्वी झोपडी अस्तित्वात होती किंवा कसे हे ठरविण्याकरिता लवकरात लवकर नवी मुंबईतील झोपडपट्टी वसाहतीचे सर्वेक्षण करण्यात यावे. शासनातर्फे उक्त निर्णयाद्वारे घोषित केलेले आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका सदर दि.01/01/2011 पर्यंतचा झोपडीधारकाचा सर्वे करणे | 93 / जुलै | 595 / 24/08/2018 | मंजूर |
| 26. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सी.बी.डी. मध्ये असलेले पूर नियंत्रण बंधारा हे निसर्गरम्य ठिकाण असून येथे निसर्गाने दिलेले वरदान आहे. येथील धबधबा पाहण्यासाठी नवी मुंबई तील नागरिक खूप गर्दी करत असतात. या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दोन सुरक्षारक्षकाची आवश्यकता आहे. कारण येथे येणाऱ्या लोकांचा खूप त्रास उद्भवत असतो. येथील जवळपास असलेले जय दुर्गामाता नगर मधील नागरीकांना पण त्रास होत असतो अनेकवेळा लुटमार व मारामारीचे प्रकार घडले आहेत. याठिकाणी सुरक्षा रक्षकाची अत्य अवश्यकता आहे तरी सुरक्षारक्षकांची नेमणूक करणे. | 94 / जुलै | 596 / 24/08/2018 | मंजूर |
| 27. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सी.बी.डी., संभाजीनगर व दुर्गामाता नगर पावसाळी नाला अपुर्ण असल्यामुळे डोंगर भागातील पावसाळी पाणी डोंगराच्या कडेला असलेली अष्टविनायक सोसायटी ग्रिन व्हेली सोसायटी असून येथील नागरीकांस पावसाच्या पाण्याचा खूप त्रास होत असून येथील पावसाळा नाला जय दुर्गामाता नगर ते संभाजीनगर मुख्य नाल्याशी जोडणे. | 95 / जुलै | 597 / 24/08/2018 | मंजूर |
| 28. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. मधील डॉ.हेगडेवार उद्यानातील कुंपन भिंतीची तुटलेली संरक्षक जाळी व इतर आवश्यक कामे करणे. | 96 / जुलै | 598 / 24/08/2018 | मंजूर |
| 29. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. मधील से.09 सुनिल गावसकर मैदानाच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीतील रहिवाशी यांच्याकरिता पदपथ तयार करणे. | 97 / जुलै | 599 / 24/08/2018 | मंजूर |
| 30. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. मधील सेक्टर 2 मधील पावसाळी गटारांची चेंबर दुरूस्ती व इतर आवश्यक कामे करणे. | 98 / जुलै | 600 / 24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 31. | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>**(99)** प्रभाग क्र. 76, सानपाडा से. 4 कामगार नेते श्री. टी. एस्. बोराडे उद्यानामागील भूखंड क्र. 13/A येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे. | 99<br>जुलै | 601<br>24/08/2018 | मंजूर |
| 32. | **श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 76, सानपाडा सेक्टर 8 "सुयोग समूह" सोसायटी समोरील पदपथाची दुरावस्था झाली असून ती नव्याने पदपथ बांधणे. | 100<br>जुलै | 602<br>24/08/2018 | मंजूर |
| 33. | **श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात काम करीत असणाऱ्या लिंक वर्कर (आशा) गेल्या 10 वर्षापासून काम करीत आहेत. त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला हा शासनाचा जी. आर. प्रमाणे कामावर आधारीत दिला जातो. हया लिंक वर्कर आपल्या करदात्या नवी मुंबईच्या नागरिकांकडे जाऊन काम करीत असल्यामुळे आपल्या नवी मुंबई महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रात काम करण्याऱ्या लिंक वर्कर (आशा) यांना दरमहा 5000/- रुपये देणे. | 101<br>जुलै | 603<br>24/08/2018 | मंजूर |
| 34. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील म्हात्रे आळी मुख्य रस्ता श्री हनुमान मंदिराच्या मागून श्री. अशोक शिंदे यांचे घरासमोरून टेटरआळीतून बाळराम बाळा रामवाडीतील सार्व. शौचालय खाडीच्या मोठ्या नाल्यापर्यंत पावसाळी पाणीवाहून नेण्यासाठी गटार बांधण्यात यावे. जे गटार ग्रामपंचायत असताना बांधलेले आहे. म्हात्रे आळी टेटरआळी बाळारामवाडी येथील नागरी वस्तीतील सांडपाणी याच गटारातून जात असते. हे गटार खराब झाल्यामुळे नवीन बांधणे. | 102<br>जुलै | 604<br>24/08/2018 | मंजूर |
| 35. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील अनंतनगर येथील श्री. स्वप्नील किशोर म्हात्रे यांचे घरासमोरून छ. शिवाजी महाराज तलावाजवळून म्हात्रे आळी कै.गटू पोशा म्हात्रे चौक मार्ग येथून तीनबावडी येथील खाडीकडे जाणारे मोठे गटारापर्यंत पावसाळी पाणी वाहून नेण्यासाठी मोठे गटार बांधण्यात यावे, अनंतनगर, म्हात्रे आळी, तीनबावडी येथील नागरी वस्तीसाठी सांडपाणी याच गटारातून जात असते हे गटार खराब झाल्यामुळे नविन बांधणे. | 103<br>जुलै | 605<br>24/08/2018 | मंजूर |
| 36. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील म्हात्रे आळी येथील श्री उत्तम पंढरीनाथ म्हात्रे यांचे घराजवळून उत्तरेकडे श्री. परशुराम म्हात्रे यांच्या घराजवळून बौध्दविहारा समोरून तीनबावडी येथील खाडीकडे जाणाऱ्या मोठ्या गटारापर्यंत पावसाळी पाणी वाहून नेण्यास मोठे गटारास बांधण्यात यावे, जे गटार ग्रामपंचायत असताना बांधले आहे. म्हात्रे आळी, तीनबावडी येथील नागरी वस्तीतील पाणी याच गाटरातून जात असते हे गटार खराब झाले आहे. त्यामुळे ते नवीन बांधणे. | 104<br>जुलै | 606<br>24/08/2018 | मंजूर |
| 37. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 51 मधील कै. शंकरराव नाईक मैदानातील इमारतीचे आतील व बाहेरील डागडूजीचे काम करणे. | 120<br>जुलै | 607<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 38. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 51 मधील पदपथाची दुरावस्था झाली असून तेथे नव्याने पदपथ बनविणे. | 121<br>जुलै | 608<br>24/08/2018 | मंजूर |
| 39. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 51 मध्ये विविध ठिकाणी नागरिकांना तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी निवारा शेड व बेंचेस बसविणे. | 122<br>जुलै | 609<br>24/08/2018 | मंजूर |
| 40. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>नेरुळ सेक्टर 16 येथील छत्रपती संभाजी राजे उदयानातील जॉगींग ट्रॅकची सुधारणा करणे. | 123<br>जुलै | 610<br>24/08/2018 | मंजूर |
| 41. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>नेरुळ सेक्टर 16 ए, 16 व 18 येथील डेब्रीज, कचरा माती पुर्णपणे उचलणे. | 124<br>जुलै | 611<br>24/08/2018 | मंजूर |
| 42. | **श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>नेरुळ, सेक्टर 16 येथील तुकाराम दिघे चौकात रेलींग बसविणे. | 125<br>जुलै | 612<br>24/08/2018 | मंजूर |
| 43. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव प्राथमिक/माध्यमिक शाळेत विदयार्थासाठी बँच (बाके) उपलब्ध करावीत शिक्षकांना टेबल खुर्ची कपाट व्यवस्था करणे. | 137<br>जुलै | 613<br>24/08/2018 | मंजूर |
| 44. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>श्रमिकनगर प्राथमिक/माध्यमिक शाळेत विदयार्थासाठी बँच (बाके) उपलब्ध करावीत शिक्षकांना टेबल खुर्ची कपाट व्यवस्था करणे. | 138<br>जुलै | 614<br>24/08/2018 | मंजूर |
| 45. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव प्राथमिक/माध्यमिक शाळा व श्रमिकनगर प्राथमिक/माध्यमिक शाळासाठी विदयार्थी संख्या/तुकडी नुसार शिक्षक उपलब्ध करणे. | 139<br>जुलै | 615<br>24/08/2018 | मंजूर |
| 46. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-**<br>घणसोली सेक्टर 15/कौल आळी स्मशान भुमी ही पिडीजात कौल आळी/पाटील आळी आणि सेक्टर 1 ते 9 मधील लोक वापर करीत असुन घणसोली नोड विकसित होत असुन लोक संख्येच्या तुलनेने भविष्यात स्मशान भुखंड सिडको कडुन हस्तांतरीत करुन अदयावत अशी स्मशान भुमी करणे | 140<br>जुलै | 616<br>24/08/2018 | मंजूर |
| 47. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-**<br>घणसोली एफ विभाग कार्यालयात कायम स्वरुपी महिला बालकल्याण तर्फे स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावे जेणे करुन बचत गट स्थापन करणे बचत गट नुतनीकरण करणे विध्वा महिलांना परित्यतकता राबवण्यात येणा-या योजना अशी अनेक कामे करण्यासाठी दिघा ते कोपरखैरणे लोकांना सी.बी.डी. येथे जावे लागत असुन महिलांचा पुर्ण दिवस व खर्चीक असुन आपण लवकरात लवकर घणसोली येथे मध्यावर कार्यालय करणे. | 141<br>जुलै | 617<br>24/08/2018 | मंजूर |
| 48. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-**<br>घणसोली एफ विभागात 13 प्रभाग मोडत असून तेथे महिला बालकल्याण विभाग मार्फत दोन समुह संघटक अपुरे पडत असुन प्रत्येक प्रभागात 1 समुह संघटक नेमण्यात यावे जेणे करुन महिला बालकल्याण विभागामार्फत चालु असलेल्या योजनाचा तळागाळातील लोकांपर्यंत पोहविणे. | 142<br>जुलै | 618<br>24/08/2018 | मंजूर |

| | |
|---|---|
| **तांतडीचे का. क्र. 78. दिनांक 20 जुलै 2018** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि. 26.08.2016 रोजी पारीत केलेला ठराव क्र. 1198 व दि.15.02.2017 रोजीचा ठराव क्र. 1274 मधील उपसूचना अंशत: निलंबित करण्याबाबत. शासन निर्णय क्रमांक :- नमुंम-1217/प्र.क्र.229/17/नवि-28, दिनांक 30 जून 2018 अन्वये अभिवेदन करणे. |
| **ठराव क्र. 619. दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि. 26.08.2016 रोजी पारीत केलेला ठराव क्र. 1198 व दि.15.02.2017 रोजीचा ठराव क्र. 1274 मधील उपसूचना अंशत: निलंबित करण्याबाबतच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अभिवेदन करणे" |
| **निर्णय.** | **मंजूर.** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**